# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

**प्रेसनोट** दिनांक :- ०२/०९/२०२३

## दिंडोरी तालुक्यातील नळवाडपाडा येथील बालीकेवर अतीप्रसंग करणा-या नराधमास वीस वर्षे शिक्षा

---

दिनांक ०१/०९/२०२३ रोजी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयातील प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती पी.व्ही. घुले सो. यांचे न्यायालयात दिंडोरी पोलीस ठाणे गुरनं । १९२/२०२२ भादवि कलम ३७६(अ)(ब), ३७६(१), ३७७ सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४,६ व ८ प्रमाणे दाखल खटल्याची सुनावणी पुर्ण होवून सदर गुन्हयातील **आरोपी नामे पवन लहु महाले,** वय १८ वर्षे ९ महिने, रा. नळवाडपाडा, ता. दिंडोरी, जि.नाशिक याचेविरूध्द आरोप सिध्द झाल्याने मा. न्यायालयाने सदर आरोपीतास भादवि कलम ३७६,३७७ सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४,५(डी)(के) ६ खाली २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व ५०,०००/- रु. दंड व दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद याप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

सदरची घटना दि. ०१ जुन २०२२ रोजी दुपारी १३:०० वा. चे दरम्यान दिंडोरी तालुक्यातील नळवाडपाडा शिवारात घडली होती. सदर गुन्हयातील आरोपी नामे पवन लहु महाले याने फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय ३ वर्षे ९ महिने हिस चिंचा खाऊ घालण्याचे बहाण्याने सोबत जवळील शेतात घेवून जावून तिचेशी अंगलट करुन अतीप्रसंग केला होता. सदर गुन्हयातील आरोपी हा घटना घडल्यानंतर फरार झाला होता, त्यास दिंडोरी पोलीस ठाणेकडील पोउनि श्री. अजय कौटे, पोउनि श्री. अमोल पवार, पोहवा टी.बी. जाधव, पोना धनंजय शिलावटे, पोकॉ प्रसाद सहाणे, अविनाश आहेर, रविंद्र चव्हाण यांनी जोरनपाडा परिसरातून ताब्यात घेवून वरील गुन्हयात अटक केली होती.

सदर गुन्हयाचा तपास दिंडोरी पोलीस ठाणेस नेमणूकीस असलेले तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद वाघ यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री. अजय कौटे यांनी केला होता. त्यांनी आरोपीविरूध्द भक्कम पुरावे गोळा करुन मा.सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्रीमती डी.डी.भिडे व श्रीमती लीना चव्हाण यांनी, तसेच पैरवी अधिकारी म्हणुन मपोशि संगिता राठोड यांनी काम पाहीले असून यातील आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत झाला आहे.

सदर गुन्हयातील तपास पथकाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी दहा हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करून अभिनंदन केले आहे.